निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २३६ वा.
गुरुवार :३० ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# केंद्र सरकारप्रमाणे महाराष्ट्राचे 'स्टेट मन्युफॅक्चरिंग मिशन' सुरू करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे,** / केंद्र सरकार राष्ट्रीय उत्पादन अभियान (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरू करत असताना त्याबरोबरीने महाराष्ट्र शासनही 'राज्य उत्पादन अभियान' सुरू करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट' स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी घोषित केले.

नीती आयोगाच्यावतीने यशदा येथे 'रिइमॅजनिंग मॅन्युफॅक्चरिंग : इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लिडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावर आयोजित 'द रोड टू इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नीती आयोगाच्या डिस्टिंग्विश्ड फेलो देबजानी घोष, सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी आदी उपस्थित होते.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासंदर्भातील रोडमॅप असलेला अत्यंत चांगला अहवाल पुण्यात प्रकाशित केल्याबद्दल नीती आयोगाला धन्यवाद देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात या क्षेत्रातील उन्नत तंत्रज्ञान पाहायला मिळते. उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी नव्या विचाराने पुढे जावे लागेल. त्यासाठी फ्रंटियर टेक्नॉलॉजी आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे जागतिक स्पर्धेत स्थान पक्के करण्यासोबत नव्या क्रांतीला सामोरे जाणे गरजेचे आहे. आज 'एआय', क्वांटम कंम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्स या तीन स्तंभांनी प्रत्येक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रभावित केले आहे. त्याचा फायदा उठविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असेही ते म्हणाले.

**प्रगत उत्पादन क्षेत्राचे नेतृत्व महाराष्ट्र करेल**

मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले की, देशाला प्रगत उत्पादन (डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रात पुढे नेताना त्याचे नेतृत्व महाराष्ट्र करेल, त्यासाठी राज्याचे मॅन्युफॅक्चरिंग मिशन सुरू केले जाईल. राज्याने विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन तयार केले असून मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील परिवर्तन हादेखील त्याचा एक भाग आहे. डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगला चालना दिली जाणार असून त्यामुळे या क्षेत्रात मोठे परिवर्तन दिसेल. इतर देशांना भारताकडे आकर्षित करताना यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्या लागतील. असे केल्यास उत्तम तसेच कल्पक बुद्धिमत्ता असलेल्यांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. महाराष्ट्राने इज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत कृतीदल स्थापन केला असून त्याअंतर्गत १०० सुधारणा करणे निश्चित केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र हे देशाचे डेटा सेंटर कॅपिटल झाले आहे. पुणे मॅन्युफॅक्चरिंग, तंत्रज्ञान क्षेत्राचे शहर आहे. पुणे व मुंबईदरम्यान क्वांटम कॉरिडॉर तयार करण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे. नवी मुंबई डेटा सेंटर शहर असून पुणे-मुंबई दरम्यान इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

या शहरात ही जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट' उभारण्याचा प्रयत्न राहील. तसेच एज्युसिटी स्थापन करण्यात येत असून त्यात १२ सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यापीठे येणार असून त्यापैकी ७ विद्यापीठे आली आहेत. महाराष्ट्राला मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात अग्रेसर ठेवताना भारताला डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगचे ग्लोबल हब बनविण्यात येईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम म्हणाले, उत्पादन क्षेत्राला वगळून कोणताही देश विकसित होऊ शकत नाही. जगात या क्षेत्रात खूप बदल होत आहेत. हे होत असताना नव्या संधीदेखील निर्माण होतात. देशात राज्य घरगुती उत्पादनात (जीएसडीपी) महाराष्ट्र पुढे आहे. मात्र कायम पुढे राहण्यासाठी निरंतर काम करावे लागते. उत्पादन क्षेत्रात पुण्याचे महत्व मोठे आहे.

मागील अंदाजपत्रकात 'राष्ट्रीय उत्पादन अभियान' (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरू करण्याचे घोषित केले. त्या अनुषंगाने काम चालू असून लवकरच प्रत्यक्षात सुरू करण्यात येईल. इतर प्रगत देशांनी ज्याप्रमाणे उत्पादन क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले त्याचप्रमाणे आपल्या देशातही आणण्यावर यात भर देण्यात येणार आहे. जगात उत्पादन क्षेत्रात वेगाने बदल होत असून या क्षेत्रात आपल्या समोर नवी संधीदेखील येत आहे. महाराष्ट्र सकल राज्य उत्पादनात, उत्पादन, थेट परदेशी गुंतवणूक, रोजगार यामध्ये अग्रेसर आहे. म्हणून राज्याकडून मोठी अपेक्षा आहे. पुण्यात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासाठी चांगली परिसंस्था (इको सिस्टीम) असून वाहनउद्योग, माहिती तंत्रज्ञान उद्योग आदी अनेक क्षेत्रात पुणे अग्रेसर आहे. राज्य शासनानेही राज्याच्या मॅन्युफॅक्चरिंग मिशनची सुरुवात करावी आणि त्यासाठी पुणे फ्रँटियार तंत्रज्ञानाचे केंद्र बनावे, असे आवाहन त्यांनी केले. फ्रँटियार टेक इंडस्ट्रीयल पार्क आणि कामगारांसाठी निवास संकुल उभारावेत, अशा अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या.




महिंद्रा समूहाच्या रुचा नानावटी यांनी राष्ट्रीय उत्पादन अभियानाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामाची माहिती दिली. उत्कृष्ट कृती दल स्थापन करून प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देणे, संशोधन व विकास क्षेत्रावर भर देण्यात येणार असून त्याचबरोबरीने भारताचे एआय मिशन आदी भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी असेल, असेही त्या म्हणाल्या.

सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी म्हणाले, भारतातील उद्योग क्षेत्रात संशोधन व विकासावर भर देण्याची आवश्यकता आहे. यात गुंतवणूक केल्यास उत्पादनात २० ते ३० टक्के वाढ होऊ शकते. उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने यासाठी सोबत काम करणे आवश्यक आहे, असे सांगून पुणे हे मोठी क्षमता असलेले उत्पादन हब आहे, असेही ते म्हणाले.

डेलॉईटचे ईश्वरन सुब्रमण्यन म्हणाले, विकसित भारतासाठी आपल्या जीडीपीची वाढ ६ टक्क्यावरून १२ टक्के आवश्यक आहे. जागतिक व्यापारात सध्याच्या २ टक्क्यावरून १० टक्क्यांवर आपला वाटा नेणे आवश्यक आहे. जर्मनी, दक्षिण कोरिया तसेच चीन देशातील जीडपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा २० टक्क्याहून अधिक वाटा आहे. या बाबी लक्षात घेऊन हा रोडमॅप तयार करण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविकात श्रीमती घोष यांनी नीती आयोगाच्या माध्यमातून प्रगत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात सुरू असलेल्या नवीन उपक्रमांची माहिती दिली. नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सध्याच्या उत्पादन क्षेत्राचे अद्ययावत उत्पादन उद्योगात रूपांतरण करण्यासाठी कल्पना सुचविण्यासाठी नीती फ्रंटियर टेक हब हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते 'इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लीडरशीप इन डव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' चे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला निती आयोगाचे अधिकारी तसेच उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## 'महिला आयोग सुपारी वाजविण्यासाठी, शत्रुच्या हॉटेलमध्येच महिला का गेली?' सुषमा अंधारेंचे खळबळजक आरोप

फलटण येथील महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात रोज नवनवीन खुलासे होत आहेत. सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत महिला आयोगावर निशाणा साधलाय. आपल्याला आणखी एक हक्कभंगाची नोटीस त्याचबरोबर ५० कोटींच्या अब्रू नुकसानीची नोटीसही आल्याची माहिती त्यांनी दिलीय.



**महिला आयोगाच्या भूमिकेवर संशय**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या फलटण दौर्यावर आणि पत्रकार परिषदेवर अंधारे यांनी कडाक्याची टीका केली. मृत डॉक्टरच्या सीडीआर (कॉल डिटेल रेकॉर्ड) वर चर्चा करताना आयोगाने माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचेही सीडीआर सार्वजनिक करण्याची मागणी केली. राष्ट्रीय महिला आयोगाने राज्य आयोगाकडून स्पष्टीकरण मागावे. तसेच आयोगाची भूमिका संशयास्पद वाटते आणि ते सुपारी घेऊन कार्यरत असल्यासारखे दिसते, असा आरोप सुषमा अंधारेनी केलाय.

**मृत्यू प्रकरणात तरुणांचा आक्रोश**

बीडमध्ये तरुणांनी टॉवरवर चढून चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी सुरू केली आहे. मृत डॉक्टरच्या बदनामीसाठी आयोग जबाबदार असल्याचा आरोप करत ते म्हणतात की, ही घटना न्यायाच्या बाजूने उभी राहण्याऐवजी राजकीय संरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. अंधारे यांनी या आंदोलनाला पाठिंबा देत सांगितले की, मृत बहिणीच्या सन्मानाची रक्षा करण्यासाठी सामान्य लोकही रस्त्यावर उतरल्याचे सुषमा अंधारेंनी यावेळी म्हटलंय.

**हस्ताक्षर आणि पत्रातील विसंगती**

मृत डॉक्टरच्या हातावरील हस्ताक्षर आणि चार पानांचे पत्रातील हस्ताक्षर जुळत नाहीत, असा खुलासा अंधारे यांनी केला. पत्रात 'निरीक्षक' हा शब्द नऊ वेळा आला असून, त्यातील वेलांटी (वीं) वेगळी आहे. हातावरील 'निरिक्षक' शब्दात पहिली वेलांटी आहे, तर पत्रात दुसरी. हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल मागवला असून, यातून पत्राची खराईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. हे सर्व पुरावे न्यायालयात सादर करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

**घटनाक्रमातील विरोधाभासामुळे संशय**

घटना घडल्यानंतर बहिणीने फोन केला तेव्हा पोलिसांनी सांगितले की, संध्याकाळी त्यांनी आत्महत्या केली आहे. पण रात्री अकरा वाजता संपदा यांच्या स्टेटसला लाईक कशी काय झाली? असा प्रश्न उपस्थित करत अंधारे यांनी संशयित व्यक्तींना चौकशीतून वगळू नये, असे सांगितले.

प्रशांत बनकर आणि पीएसआय गोपाळ बदने यांचे हजर होणे संशयास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे प्रकरण राजकीय षडयंत्र असल्याचा आरोप करत त्या म्हणाल्या की, न्याय मिळवण्यासाठी लढा सुरूच राहील, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

## सातारा महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात अत्यंत धक्कादायक ट्विस्ट! डॉक्टरने मृत्यूपूर्वी एक सेल्फी संशयित आरोपीच्या मोबाईलवर पाठवला?

**सातारा**/ साताऱ्याच्या फलटणमध्ये डॉक्टर तरूणीच्या आत्महत्येनंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. पोलीस अधिकाऱ्यानं चारवेळा लैंगिक केल्याचा आरोप महिला डॉक्टरानं आपलं जीवन संपवलंय. २१ वेळा तक्रार करूनही दखल घेतली नसल्याचं म्हणत महिला डॉक्टरानं टोकाचं पाऊल उचललंय. हातावर सुसाईड नोट लिहित महिला डॉक्टरानं पोलीस अधिकारी गोपाल मदने आणि डॉक्टर महिला ज्या घरात राहत होती त्या घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकरवर गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणात धक्कादायक ट्विस्ट आला आहे. डॉक्टरने मृत्यूपूर्वी एक सेल्फी संशयित आरोपीच्या मोबाईलवर पाठवल्याचा माहिती समोर येत आहे.

साताऱ्यातील फलटणमधील हॉटेलमधला सीसीटीव्ही झी २४ च्या हाती लागलाय. डॉक्टर महिलेचा आत्महत्येपूर्वीचा हा सीसीटीव्ही फुटेज आहे. यात डॉक्टर महिला रुममध्ये जाताना दिसत आहे. आत्महत्येच्या काही वेळापूर्वीचा व्हिडिओ झी २४ तासच्या हाती लागलाय.

मयत डॉक्टरने आत्महत्या करण्या आधी लटकवलेली ओढणीचा सेल्फी संशयित आरोपी प्रशांत बनकर च्या मोबाईलवर पाठवल्याची सूत्रांची माहिती आहे. मात्र, पोलिसांकडून अद्याप याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात आरोपी गोपाल बदनेची बदमाशी सुरुच आहे. मुख्य आरोपी पीएसआय गोपाल बदने याने आपला मोबाईल लपवला. पोलिसांना शरण येण्यापूर्वी गोपाल बदने याने त्याचा मोबाईल लपवला.पीएसआय गोपाल बदनेच्या मोबाईलचा शोध पोलीस घेत आहेत. महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा असलेला पीएसआय गोपाल बदने याचा मोबाईल आहे. तर दोन्ही आरोपीं महिला डॉक्टरच्या संपर्कात असल्याची कबुली पोलिसांना देखील दिली आहे..




दरम्यान, फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात डॉक्टरांचं व्हाट्सअप चॅट डिलीट झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. याबाबत पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांनी मिळालेले सर्व डिजिटल पुराव्याची सायबर टीममार्फत तपासणी सुरू आहे. कोणतेही पुरावे डिलीट झाले नाही. अशी माहिती दिली. तसंच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनदेखील त्यांनी केले.

सातारा जिल्ह्यातील बावधन गावात राहणाऱ्या पाचांगणे या कुटुंबाने अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर यांची भेट घेतली. आपल्या मुलीची आत्महत्या नाही तर खून झाल्याचा आरोप त्यांनी केलाय. इंजिनियर असलेल्या विवाहित मुलीनं आत्महत्या केली अशी बातमी आपल्याला १७ ऑगस्ट रोजी मिळाली. या वेळी आमच्या मुलीचा शवविच्छेदन अहवाल फलटण उपजिल्हा रुग्णालयात झाला होता. तेव्हा जो अहवाल बनवण्यात आला होता तो अहवाल, नुकत्याच आत्महत्या केलेल्या डॉक्टर तरुणीनंच बनवल्याचं या कुटुंबाचं सांगणं आहे.

तो चुकीचा अहवाल देण्यासाठी मृत डॉक्टर तरुणीवर राजकीय दबाव असण्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे.

# डॉ. होमी जहांगीर भाभा ...

**भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते.**

**अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!**

# "जागतिक बचत दिन" आर्थिक जबाबदारीचे सामाजिक भान !

जागतिकीकरणाच्या, उपभोगतावादाच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या या युगात 'बचत' ही केवळ आर्थिक क्रिया न राहता ती एक सामाजिक मूल्य, संस्कृती आणि नागरिक जबाबदारी म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. दरवर्षी ३० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'जागतिक बचत दिन (थीश्रव ढहीळर्षीं ऊू)' म्हणजे केवळ आर्थिक संस्थांचा उत्सव नसून, तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या एकत्रित शाश्वत भविष्यासाठीची सजगता दाखवणारा दिवस आहे. या दिवसाची संकल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर निर्माण झाली. १९२४ मध्ये इटलीतील मिलान येथे झालेल्या पहिल्या खपींशीपरींळेपरश्र डरींळपसी इरपज्ञ उेपसीशीी मध्ये या दिनाचे औचित्य जाहीर करण्यात आले. त्यामागील उद्दिष्ट होते की लोकांना बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, आणि 'थोडे आज राखले तर उद्याचा दिवस सुरक्षित राहील' हा मूलभूत विचार जनमानसात रुजवणे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, 'बचत' ही फक्त पैशाची साठवणूक नाही; ती समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक शिस्तीचा भाग आहे. प्रत्येक समाजाची आर्थिक रचना त्याच्या सामाजिक वृत्तीवर आधारित असते. मॅक्स वेबर यांनी मांडलेल्या 'झ्रीेंशीींरपीं ऐींहळल रपव ींहश डळीळीं ष उरळींरश्रळीा' या सिद्धांतानुसार, आर्थिक शिस्त, मेहनतीची सवय आणि बचतीची वृत्ती या गोष्टी भांडवलशाहीच्या वाढीस कारणीभूत ठरल्या. यावरून दिसते की बचत ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही गुरुकिल्ली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारपणे संसाधनांचा वापर करणे आणि उद्यासाठी काही राखून ठेवणे हेच शाश्वत समाजाचे लक्षण आहे.

भारतीय समाजाच्या पारंपरिक संरचनेत 'बचत' ही संकल्पना फार जुनी आहे. भारतीय संस्कृतीत 'अर्धेच खा, उरलेले उद्यासाठी राखून ठेवा' अशी जीवनशैली सुचवण्यात आली होती. आपल्याकडे 'मावळता सूर्य पाहून दिवा विझवू नका' अशी म्हण आहे, तिच्यामागेही भविष्याची तयारी, नियोजन आणि शिस्तबद्धता यांचा संकेत आहे. ग्रामिण समाजात पूर्वी घरात धान्य, बियाणे, किंवा पैशाचा थोडासा साठा ठेवण्याची सवय होती. स्त्रिया आपल्या अल्प उत्पन्नातूनही सोन्याचे दागिने, धान्य किंवा थोडेसे पैसे साठवून ठेवत असत हेच प्रत्यक्षात 'घरोघरी बचत संस्कृतीचे' पहिले रूप होते.

आजच्या आधुनिक समाजात मात्र उपभोगतावादाची प्रवृत्ती वाढली आहे. त्वरित समाधान, लक्झरीचा मोह आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे 'उद्यासाठी बचत' ही कल्पना मागे पडत चालली आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे. एक काळ असा होता की बचत ही 'मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा' आधार होती. पण आता ती हळूहळू 'उपभोगवादी संस्कृतीच्या' प्रभावाखाली दबली आहे. जाहिराती, सोशल मीडिया, ब्रँडेड जीवनशैली, आणि कर्जाधारित अर्थव्यवस्था यांनी व्यक्तीच्या विचारांवर परिणाम केला आहे. 'आत्ताच खर्च करा, नंतर विचार करा' ही मानसिकता नव्या पिढीच्या जीवनशैलीत शिरली आहे. या प्रवृत्तीचा परिणाम केवळ आर्थिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक अस्थैर्य निर्माण करणारा आहे. समाजशास्त्रानुसार, बचत ही सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा पाया आहे. जे समाज भविष्यासाठी नियोजन करतात, संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करतात आणि अनावश्यक खर्च टाळतात, ते समाज संकटकाळात अधिक मजबूत राहतात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात ज्या कुटुंबांकडे थोडीफार बचत होती, त्यांनी रोजगार, उत्पन्न आणि आरोग्य संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे गेले. दुसरीकडे, अनियोजित खर्च करणाऱ्या, किंवा 'दिवसेंदिवस जगणाऱ्या' कुटुंबांना अत्यंत आर्थिक ताण सहन करावा लागला. त्यामुळे बचत ही केवळ वैयक्तिक नाही तर सामूहिक सामाजिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे.

भारतीय ग्रामीण समाजात बचतीचे रूप 'स्वयं-सहायता गटां'द्वारे अधिक दृढ झाले आहे. महाराष्ट्रातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवले नाही, तर सामाजिक निर्णय प्रक्रियेतही आपला सहभाग वाढवला आहे. अशा गटांनी बचतीची संस्कृती समाजाच्या तळागाळात रुजवली आहे. याला समाजशास्त्रीय अर्थाने 'ग्रामस्तरीय सामाजिक पूंजी' म्हणता येईल. बचतीद्वारे निर्माण झालेला हा सामाजिक विश्वास आणि सहकार्याचा पाया, समाजातील परस्परावलंबित्व अधिक दृढ करतो.

अर्थशास्त्रज्ञ ॲमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी क्षमतांची वाढ होय. बचत हे त्या क्षमतावृद्धीचे मूलभूत साधन आहे. बचत आपल्याला स्वावलंबन देते, निर्णयक्षमता वाढवते आणि जीवनातील अनिश्चिततेविरुद्ध सुरक्षा कवच तयार करते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक बचतीचे महत्त्व ओळखतो, तेव्हा समाजात 'आर्थिक लोकशाही' मजबूत होते. याचा अर्थ, समाजातील सर्व स्तरांना आपल्या गरजा पूर्ण करण्याची आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची समान संधी मिळते. जागतिक बचत दिनाचा उद्देश केवळ बँकांमध्ये पैसे ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्यामागे एक व्यापक सामाजिक अर्थ आहे, तो म्हणजे 'जबाबदार उपभोग' आणि 'शाश्वत विकास' होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, बचत आणि शाश्वतता या एकमेकांशी घट्ट निगडित संकल्पना आहेत. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संसाधनांचा वापर मर्यादित केला आणि उद्यासाठी थोडे राखून ठेवले, तर समाजातील विषमता कमी होईल. अशा प्रकारे बचत ही समानतेच्या सामाजिक तत्त्वाची पायाभरणी करते. पण बचत केवळ आर्थिक न राहता ती मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपातही आवश्यक आहे. वेळेची बचत, ऊर्जेची बचत, संसाधनांची बचत हे सर्व 'सामाजिक जबाबदारी'च्या रूपात पाहायला हवे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जेची बचत आणि संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन ही समाजशास्त्रीय दृष्टीने 'सामूहिक बचत संस्कृती'चीच विस्तारित रूपे आहेत. समाजातील ही जागरूकताच शाश्वत समाज निर्माण करू शकते.

शिक्षणक्षेत्रातही बचतीची संस्कृती रुजवणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आर्थिक साक्षरता, बचतीचे महत्त्व आणि संसाधन व्यवस्थापन यावर शिक्षण दिले गेले तर नवी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडेल. जर्मनी, जपान, स्वित्झर्लंडसारख्या देशांनी आपल्या नागरिकांमध्ये लहानपणापासून बचतीची सवय लावली आणि त्यामुळेच त्यांचे समाज आर्थिकदृष्ट्या स्थिर झाले. भारतातही 'पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज', 'जन-धन योजना', 'सुकन्या समृद्धी योजना' अशा उपक्रमांद्वारे सरकारने बचतीचा प्रसार करण्याचे प्रयत्न केले आहेत. पण खरी गरज आहे ती 'बचत ही समाजाचा सांस्कृतिक स्वभाव बनवणे' या उद्दिष्टाची. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांनी सांगितले की, समाजातील नैतिक मूल्ये आणि नियम हे समाजाच्या एकात्मतेचे सूत्र आहेत. बचतीची संस्कृतीही असेच एक नैतिक मूल्य आहे. ती व्यक्तीला संयम, आत्मशिस्त आणि उत्तरदायित्व शिकवते. या मूल्यांच्या आधारे समाजात स्थैर्य आणि एकात्मता निर्माण होते. म्हणूनच जागतिक बचत दिन हा फक्त आर्थिक शिक्षणाचा दिवस नाही; तो सामाजिक नैतिकतेच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे.

आधुनिक काळातील डिजिटल व्यवहार, ऑनलाइन गुंतवणूकीच्या युगात बचतीची संकल्पना नवे रूप घेत आहे. डिजिटल बँकिंग, यूपीआय, मोबाईल वॉलेट यामुळे व्यवहार सोपे झाले आहेत, पण त्याचबरोबर 'त्वरित खर्च' करण्याची प्रवृत्तीही वाढली आहे. म्हणूनच डिजिटल बचतीचे शहाणपण आवश्यक आहे, म्हणजेच नियोजनपूर्वक गुंतवणूक, सुरक्षित वित्तीय साधनांची निवड आणि फसवणुकीपासून संरक्षण होय. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, ही डिजिटल बचतसंस्कृती म्हणजे 'आधुनिक समाजातील आर्थिक साक्षरतेचा' एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

शेवटी, बचत ही फक्त पैशाची गोष्ट नाही, ती भविष्याची, स्थैर्याची आणि जबाबदारीची गोष्ट आहे. जो समाज आजची गरज आणि उद्याची तयारी यांच्यात समतोल राखतो, तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो. म्हणूनच जागतिक बचत दिन हा प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. आपण आज किती खर्च करतो आणि उद्यासाठी किती राखून ठेवतो? समाजशास्त्र सांगते की, व्यक्तीचा विवेकशील आर्थिक निर्णय हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आरसा असतो. बचत म्हणजे फक्त आर्थिक नियोजन नव्हे, तर सामाजिक शिस्तीचे आणि नैतिक जबाबदारीचे जिवंत प्रतीक आहे. म्हणूनच या जागतिक बचत दिनानिमित्त आपण सर्वांनी ठरवले पाहिजे की बचत करणे म्हणजे फक्त पैसे वाचवणे नव्हे, तर समाजाला स्थैर्य, जबाबदारी आणि शाश्वत भविष्य देणे होय.

**- डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# शिक्षकाचा नाद करायचा नाही...



वर्गात प्राध्यापकांनी मानसशास्त्राचा तास घ्यायला सुरुवात केली होती.तेवढ्यात मागून एका मुलाने शिट्टी वाजवली.प्राध्यापकांनी शिट्टी कोणी वाजवली असं विचारल्यावर संपूर्ण वर्ग शांत बसला मात्र कोणीच नाव सांगितलं नाही. सरांनी हातातला खडू खाली ठेवलाआणि म्हणाले : आपला आजचा तास इथेच संपतो आहे, पण राहिलेला वेळ सार्थकी लावण्यासाठी मी तुम्हाला कालच रात्री घडलेला एक किस्सा सांगतो...! किस्सा ऐकण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी कान टवकारले.काल रात्री उशिरापर्यंत मला झोप येत नव्हती. वेळ काढायचा म्हणून गाडीत पेट्रोल भरून येऊ असा विचार माझ्या मनात आला म्हणून गाडी काढून मी पेट्रोल भरून घेतलं.पेट्रोल भरल्यावर सहजच मी एका शांत रस्त्यावर गाडी वळवली.रस्त्याच्या कोपऱ्यावर एक अतिशय सुंदर मुलगी उभी होती.मी गाडी तिच्याजवळ थांबवून तिला विचारलं : मॅडम,मी आपली काही मदत करू शकतो का...? हो,मला घरापर्यंत सोडू शकलात तर फार बरं होईल...! गाडीचा दरवाजा उघडून मी तिला आत घेतलं,आणि तिच्या घराच्या दिशेने गाडी वळवली.वाटेत आम्ही विविध विषयांवर चर्चा करत होतो. सौन्दर्यासोबतच बुद्धिमत्तेची देणगी लाभलेल्या निवडक स्त्रियांमध्ये मी तिचा समावेश करेन...तिच्या घराशी पोहचल्यावर तिने लाजत लाजत कबूल केले की माझ्या सहृदय वागण्यामुळे ती माझ्या प्रेमात पडली आहे.मी ही तिच्या सौन्दर्याची आणि बुद्धिमत्तेची तारीफ करत तिच्या प्रेमात पडल्याची कबुली तिला दिली. एकमेकांशी बोलताना मी तिला माझ्या पेशाबद्दल सांगितलं. निरोप घेताना आम्ही फोन नंबरची अदलाबदल केली. अगदी शेवटच्या क्षणी तिने मला सांगितलं की तिचा भाऊ मी शिकवत असलेल्याच महाविद्यालयात शिकतो,त्यामुळे होणारा दाजी या नात्याने मी त्याची काळजी घ्यावी.मी तिला त्याचं नाव विचारलं त्यावर तिने उत्तर दिलं की तुम्ही त्याला त्याच्या खास सवयीवरून लगेच ओळखाल. 'तो अतिशय उत्तम शिट्टी वाजवतो' प्राध्यापकांच्या या वाक्यावर अख्खा वर्ग मगाशी शिट्टी वाजवलेल्या विद्यार्थ्यांकडे बघायला लागला.प्राध्यापक महाशय त्या विद्यार्थ्याकडे बघून हसून म्हणाले: माझी मानसशास्त्राची पदवी व ज्ञान मी विकत घेतलेलं नाही तर स्वकष्टाने प्राप्त केलं आहे. निघ बाहेर वर्गाच्या...! वाचण्यात आलेला सुंदर लेख.

# दक्षता जनजागृती सप्ताह २०२५
# भ्रष्टाचाराची तक्रार १०६४ टोल फ्री क्रमांकावर करा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी/** दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जिल्ह्याभरात प्रत्येक कार्यालयात लोकसेवकांचे व नागरिकांचे प्रबोधन करावे, जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात लोकसेवकांनी लाच मागितल्यास १०६४ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.




दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात जनजागृती फलकाचे अनावरण करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे, पोलीस उपअधीक्षक सुरेश नाईकनवरे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, संगिता राठोड, संगिता सानप तसेच अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दक्षता जनजागृती सप्ताह सध्या राबविण्यात येत आहे. यानिमित्त आयोजीत या कार्यक्रमात न्टीकरप्शन ब्युरोच्या पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे यांनी सांगितले की, एखाद्या लोकसेवकाकडून लाचेची मागणी होत असल्यास नागरिकांना तक्रार करण्याचा अधिकार आहे.त्यासाठी त्यांनी १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच ७७२०८९१०६४ या व्हॉट्सअप क्रमांकावरही संपर्क साधू शकता.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याची माहिती द्यावी. आपल्या कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांनाही ही माहिती द्यावी. त्यासाठी प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन सप्ताहानिमित्त करावे,असे आवाहन केले. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय कार्यालये, तहसिल कार्यालये, गटविकास अधिकारी आदी दुरदृष्यप्रणालीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक सत्संगाकरिता दिल्लीस रवाना

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी /** दिल्ली येथे होणाऱ्या समागम सत्संग - २०२५ या भव्य आध्यात्मिक सोहळ्यासाठी जालना जिल्ह्यासह नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनेक संत निरंकारी भाविक आज दि.२९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या सत्संगाकरिता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून मागील तीन वर्षापूर्वी सुरु करण्यात आलेल्या नांदेड ते पानिपत या विशेष रेल्वे गाडीने आज रवाना झाले.






जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक जालना रेल्वे स्थानकावरून या विशेष रेल्वेने सर्व जन रवाना होत असताना भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, जालना जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे, नगरसेविका सौ. संध्याताई देठे, कपिल दहेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला व सकाळी ११.३० वा हि रेल्वे गाडी जालना रेल्वे स्थानकावरून पुढील प्रवासाकरिता रवाना झाली.

यावेळी बोलताना शुभेच्छा पर बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, या जिल्ह्याचे लोकनेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे रेल्वे राज्यमंत्री असताना जालना जिल्ह्याला अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून दिल्या ज्यामध्ये जनशताब्दी एक्स्प्रेस, वंदेभारत एक्स्प्रेस, ओखा एक्स्प्रेस, छपरा एक्स्प्रेस इत्यादी गाड्यासह अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून जालना जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, तीर्थयात्री इत्यादीसह जनतेची होणारी प्रवासाची गैरसोय दूर केली. ते बघून मागील तीन वर्षापासून जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक उत्तर भारतात होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यासाठी जातात त्यासाठी त्यांनी दानवे साहेबाना विनंती करून विशेष रेल्वे गाडीची मागणी केली होती.

दानवे साहेबांनी स्वत: प्रयत्न करून या भाविकांची अडचण दूर करण्यासाठी अध्यात्मिक सोहळ्यासाठी नांदेड ते पानिपत हि विशेष गाडी सुरु करून भाविकांची अडचण सोडवली.

यावेळी मान्यवरांनी रेल्वे चालक तसेच जाणाऱ्या सर्व भाविकांचे पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, विष्णू डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, इत्यादीसह शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**घनसावंगी तालुक्यातील समृद्धी कारखान्याचे चे संचालक विकी शिंदे यांनी आपल्या शेतातून ऊस तोड बैलाला दिला मोफत चारा**

घनसावंगी तालुक्यात ऊसाचे क्षेत्र जास्त असल्यामुळे बाहेरगावाहून ऊस तोड मजूर आपल्या बैल गाड्या सहित आपल्या कारखान्याच्या करारा प्रमाणे आलेले आहेत मात्र घनसावंगी तालुक्यात सलग तिन ते चार दिवसापासून पाऊस चालू आहे पावसामुळे सध्या ऊस तोडता येत नसल्यामुळे ऊस तोड वाहतूक करणार्या बैलाला काही खायला नसल्यामुळे समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन .सतिशराव घाटगे पाटील यांच्या आदेशानुसार समृद्धी कारखान्याचे संचालक विक्की शिंदे यांनी त्या बैलाची खाण्यापिण्याची परिस्थिती पाहता आपल्या स्वतःच्या शेतीतील ऊस बैलांना वैरण म्हणून मोफत दिला

## संक्षिप्त

## इच्छुकांची उमेदवारी मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठीकडे धावपळ काही दिवसांपासून सुरु झाली आहे

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा/** स्थानीक स्वराज्य संस्थेच्या निवडणुक आरक्षण जाहीर झाले असुन उमेदवारी मिळवण्यासाठी ईच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली आहे प्रत्येक पक्षाचे उमेदवार उमेदवारी मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठीचे उंबरठे झीजवत आहेत. तर काही इकडून तिकडे



वारंवार पक्ष बदलणारे बंडखोर सुध्दा पक्षाकडे प्रबळ दावा करीत आहे की, मीच निवडून येणार आहे. त्यामुळे मला उमेदवारी देण्यात यावी यामुळे पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी वाढली आहे, त्याच बरोबर सर्वच पक्षाचे बैठकीचे सत्र सुरू झाले आहे. अद्याप पर्यत कोणत्याच पक्षाने कोणत्याच प्रभागात किंवा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर केला नाही त्यामुळे अनेक उमेदवार उमेदवारी मिळवण्यासाठी निवडणुक गुडघ्याला बाशीग बांधुन तयार आहेत बरेच पक्ष हे नगरपंचायत ची निवडणुक लढवण्यासाठी रिंगणात उत्तरत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे मित्र पक्षा सोबत पुती होते की स्वबळावर निवडणुक लढवेल याकडे उमेदवारासह पक्षातील दिग्गज नेते व जनतेचे लक्ष लागले आहे. सध्या तरी तिकीट मिळवण्यासाठी उमेदवाराची कसरत चालु असुन किसमे कितना है दम! असे चित्र दिसत आहे. नगराध्यक्ष पदाच्या दावेदारासह, नगरसेवका साठी सुध्दा उमेदवारी जाहीर झाल्यानंतर कित्येक ईच्छुक उमेदवार उमेदवारी न मिळाल्यास बंडखोरी करतील तर काही पक्षाचे एकनिष्ठ नेते काम करतील हे सुध्दा येणारी वेळ सांगेल परंतु सध्यातरी अनेक ईच्छुक उमेदवार आप आपल्या प्रभागामध्ये प्रचाराला लागले असुन पक्षातर्फे तिकिट मिळो अथवा ना मिळो मात्र सोशल मीडिया च्या माध्यमातून मी किती प्रबळ आहे. हे दाखवण्याचा पोस्टरच्या माध्यमातुन व बॅनरबाजीच्या माध्यमातून दिसुन येत आहे. सध्यातरी उमेदवारीच्या बाबतीमध्ये कोण किसपे भारी हेच चित्र आहे. काही दिवसातच ज्या ज्या पक्षा तर्फे नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व प्रभाग निहाय नगरसेवकासाठी उमेदवार जाहीर करण्यात येईल याकडे ईच्छुक उमेदवारांसह मतदारांची उत्सुकता वाढली आहे...

# देवस्थानाचा मान वाढवू सिल्लोड सोयगावला नवी दिशा असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / सिल्लोड तालुक्यातील देवस्थानांचा मान वाढवू सिल्लोड-सोयगावला नवी प्रगतीची दिशा दाखवू. महाराष्ट्रचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबई येथे सांगीतल यांनी



सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील विविध धार्मिक स्थळे व देवस्थानांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून भक्तांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होतील तसेच धार्मिक पर्यटनाला चालना मिळून विकासाला नवी दिशा मिळेल अशी मागणी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.या निवेदनातून मतदारसंघातील अन्य महत्त्वाच्या मागण्यांचाही पाठपुरावा करण्यात आला.

यावेळी धानोरा येथील स्वामी सर्वानंद सरस्वती महाराज, जगन्नाथ गिरी महार-ाज, भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड सोयगाव विधानसभा नेते मा. सुरेश भाऊ बनकर माजी आमदार मा. सांडू पाटील लोखंडे, जिल्हा सरचिटणीस मा.ज्ञानेश्वर पाटील मोठे आदी मान्यवर उपस्थित होते.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना प्रलंबित प्रकरणांचे निराकरण करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** / प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची बँकांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा त्वरीत निपटारा करुन त्याचे निराकरण करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज जिल्ह्यातील बँकेच्या अधिकाऱ्यांना दिले.



प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत बँकांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला. बैठकीस कृषी उपसंचालक दीपक गवळी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रेषित मोघे, तसेच सर्व बँकांचे अधिकारी उप-स्थित होते. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (झचऋचए) ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०२० ते २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हा देशात प्रथम आला आहे,असे कृषी उपसंचालक दीपक गवळी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या अंमलबजावणीत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये पुन्हा देशामध्ये प्रथम येण्यासाठी आपण प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

बँकस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे निराकरण करुन संबंधित बँकांनी प्रकरणे निकाली काढावी. मंजूर प्रकरणांची माहिती नियमानुसार पोर्टलवर अपलोड करावी.

या वर्षीही छत्रपती संभाजीनगर जिल्हा देशात प्रथम येण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत उपस्थित सर्वांना सूचना दिल्या. तसेच यामध्ये अनावश्यक दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे सूचित केले.

# तक्रारींच्या निपटाऱ्यासाठी ६ नोव्हेंबरला; सर्व तहसिल, उपविभागीय कार्यालयात विशेष कॅम्प

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** / जिल्ह्यातील विविध व्यक्ति- संस्था यांच्याकडून मंत्री महोदयांकडे निवेदने, तक्रारी देत असतात ही सर्व निवेदने, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी गुरुवार दि.६ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व तहसिल, उपविभागीय कार्यालयांमध्ये एकाच दिवशी विशेष कॅम्प आयोजीत करुन तक्रारींचा निपटारा करण्यात येईल,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व विभागांना दिले आहेत.



या संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजीत करण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, संगिता राठोड, संगिता सानप तसेच अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते. क्षेत्रीय अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

जिल्ह्यातील प्राप्त तक्रारी, निवेदनांचे निराकरण करण्याबाबत निपटारा तक्रारींचा हा उपक्रम राबविण्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांनी घोषीत केले. त्यानुसार, नागरिकांनी मंत्री महोदय तसेच अन्य वरिष्ठ पा-तळीवर सादर केलेल्या विविध तक्रारी व निवेदनांच्या तात्काळ आणि प्रभावी निपटाऱ्यासाठी महसूल विभागाकडून 'निपटारा तक्रारींचा' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहीमेत दि. २७ ऑक्टोंबर २०२५ अखेर प्राप्त सर्व तक्रारींचा समावेश करण्यात येऊन त्यांचे निराकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी गुरुव-ार दि. ६ नोव्हेंबर रोजी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसी-लदार कार्यालयात विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे.

स्थानिक पातळीवरील मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आदी या अभियानात सहभागी होतील, नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी, अर्ज, निवेदने यांचा सखोल आढावा घेऊन प्रत्यक्ष निवारण करण्यात येईल. या अभियानात प्रत्येक तालुक्यातील अधिकारी यांनी तक्रारींचा पाठपुरावा करून, तक्रारदारांशी संपर्क साधून त्यांच्या निवेदनांचा निकाल कायदेशीर चौकटीत काढावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रारींच्या कार्यवाहीची संपूर्ण नोंद ठेवून, ज्यांच्या अर्जांचा निपटारा झाला आहे त्यांना लेखी स्वरूपात कळविण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

या मोहिमेत सर्व प्रशासकीय विभागांचे सहकार्य अपेक्षित असून, ग्रामपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे तात्काळ निव-ारण हेच उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

# खरडलेल्या जमिनी व बुजलेल्या विहीरींच्या दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य प्रस्ताव त्वरीत पाठवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी** / अतिवृष्टीमुळे शेतजमिनी खरडल्या व विहीरी गाळाने बुजल्या व खचल्या. या जमिनींची व विहिरींची दुरुस्ती करता यावी यासाठी शासनाने अर्थसहाय्य देऊ केले आहे. ही



कामे महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणार असून त्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी आपापल्या तालुक्यातील अर्थसहाय्य प्रस्ताव त्वरीत पाठवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांची आज दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. दोन्ही प्रकारच्या नुकसानीत अनुज्ञेय अर्थसहाय्य देण्यासाठी शासनाच्या नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) शासन निर्णय अनुक्रमे दि.१० व दि.१३ ऑक्टोंबर रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

त्यानुसार खरडलेल्या जमिनी ला-गवड करण्यायोग्य दुरुस्त करुन देण्याचे कामे महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजने-तून करावयाची आहेत. त्यासाठी लहान व सीमांत शेतकरी (कमाल मर्यादा २ हेक्टर) यांच्या जमिनींची दुरुस्ती करण्यात येणार आहे.त्यासाठी संबंधित बाधीत शेतकऱ्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे सातबारा व खातेउतारा यांच्याप्रतिसह लेखी अर्ज करावयाचा आहे.तांत्रिक अधिकारी पा-हणी करुन कामनिहाय अंदाज पत्रक तयार करण्यात येईल.या अंदाजपत्रकांना कृषी विस्तार अधिकारी किंवा शाखा अभियंता तांत्रिक मान्यता प्रदान करतील व गटविकास अधिकारी यांच्यामार्फत हे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे आल्यावर एकूण खर्चास मान्यता प्रदान करतील. या कामांसाठी अंदाजपत्रकिय रक्कम जास्तीत जास्त ३ लाख रुपये प्रति हेक्टर या मर्यादेत व २ हेक्टर कमाल मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत अनुज्ञेय राह-तील. तसेच खचलेल्या व बुजलेल्या विहीरींसाठी प्रति विहिर कमाल मर्यादा ३० हजार रुपये अनुज्ञेय असेल.

या कामांची प्रक्रिया सर्व यंत्रणांनी तातडीने राबवावी व शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी. ज्या शेतकऱ्यांकडे जॉब कार्ड नाही त्यांचे जॉब कार्ड काढून त्यांना योजनेचा लाभ द्यावयाचा आहे.

त्यादृष्टिने त्वरीत अनुदान मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# फुलंब्री-खुलताबाद महामार्गावरील सराई गावाजवळ शिवसेना उबाठाचे रस्ता रोको आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद तालुक्यातील सराई गाव-ाजवळील फुलंब्री-खुलताबाद महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून काही दिवसांपूर्वी या ठिकाणी एका अनेक छोटे-मोठे अपघात झाला असून या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. २९ ऑक्टोबर) शिवसेना (उद्धव बाळास-ाहेब ठाकरे) गटाच्या वतीने तालुका प्रमुख राजू वरकड यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला या रास्ता रोकोमुळे काही काळ वाहतुक कोंडी झाली होती..

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक डोळ्यासमोर ठेवून शिवसेना उद्धव गटाचे वतीने खुलताबाद फुलंब्री महामार्गावर सराई गावाजवळ रस्ता रोको आंदोलन करण्यात आले या आंदोलनात जिल्हा परिषद आगामी पंचायत समिती निवडणुकीत भावी उमेदवार यांनी या आंदोलन उभे केल्याची चर्चा खुलताबाद तालुक्यात सुरू आहे .

विशेष म्हणजे गेल्या अनेक वर्षापासून हा रस्त्यावर खड्डे पडलेले होते मात्र आगामी निवडणुकीच्या वातावरण निर्मिती करण्याचे उद्देशाने आंदोलन करण्यात आले विशेष म्हणजे शिवसेना उद्धव गटाचे तालुक्यात अस्तित्वा कमी झालेले आहे आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने पुन्हा चर्चेत रहावे म्हणून आंदोलन उभारण्यात आले होते.



असेही चर्चा तालुक्याभरात सुरू आहे..मात्र,या आंदोलना आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय राजकीय स्टॅन्ड बाजी सुरू झाल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे. आंदोलनात शिवसेना (उद्धव) गटाचे भावी उमेदवार सहभागी झाल्याने या आंदोलनाला राजकीय रंग चढल्याचे दिसून आले.

स्थानिक राजकारणात सध्या गटबाजी आणि शक्तिप्रदर्शनाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने या आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, गेल्या पाच वर्षांपासून आम्ही या रस्त्याच्या प्रश्नासाठी लढा देत आहोत,मात्र अद्याप तो सुटलेला नाही. हे आंदोलन जनतेच्या हितासाठी असून याचा निवडणुकीशी काही संबंध नाही. विरोधक म्हणजे 'तीनही भाऊ मिळून खाऊ', अशी गंमत आहे.

शिवसेना (उबाठा) नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी तत्पर राहिली आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना उपविभाग प्रमुख आदिनाथ नागे यांनी व्यक्त केली. आंदोलनानंतर महामार्ग विभागाचे अधिकारी आणि नायब तहसीलदार संतोष पांढरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी विधानसभा संघटक गणेश अधा-ने आजिनाथ नागे सर्कल प्रमुख विजय चव्हाण शहर प्रमुख विष्णू फुलारे. यांचे सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आत्मदहन आंदोलन तात्पुरते मागे - प्रदिप पाटील चव्हाण जिल्हाध्यक्ष

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी / सुभान शहा/** दिलेल्या लेखी आश्वासनात नमूद करण्यात आले आहे की आंदोलनातील मागणीतील विषयाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय संभाजीनगर यांना कळविण्यात आले असून शासनाचे पुढील आदेश आल्यानंतर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल करीता लेखी आश्वासन देऊन तात्पुरते आंदोलन स्थगित करण्यात आले आहेत.शासनाने म्हटल्याप्रमाणे दीपावलीच्या अगोदर गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे पिकांची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे आत्मदहन आंदोलन व शासकीय मका खरेदी केंद्र गंगापुर तालुक्यात चालू करण्याची मागणी चे निवेदन दि. २९/१०/२०२५ देण्यात आले



अतिवृष्टी पावसामुळे शेतीच्या पिकाचे फार मोठे नुकसान झाले आहे. शासनाने दीपावली अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यात सरसकट अनुदान देण्याचे घोषित केले होते परंतु खात्यात काही अनुदान शास-नाने जमा केले नाही, शेतक-यांची दिवाळी ही अंधारातच झाली, शासनाला शेतकऱ्यांचे काही गांभीर्य वाटतच नाही शेतकरी हा कर्जबाजारी झालेला आहे शासकीय मका खरेदी केंद्र त्वरित चालू करा कापूस खरेदी केंद्र त्वरित चालू करा शासकीय भावाने मका खरेदी झाली पाहिजे या सर्व समस्या शासनाने त्वरित सोडल्या पाहिजे या शासनाला जाग येण्यासाठी तसेच गंगापुर तालुक्यातील शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी दिनांक २९/१०/२०२५ रोजी तह-सीलदार यांच्या केबिनमध्ये जाऊन सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी कामगार संघटनेचा जिल्हाध्यक्ष या नात्याने शेतकरी हितासाठी आंदोलन केले.लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आत्मदहन आंदोलन तात्पुरते मागे या आंदोलनात प्रदिप पाटील चव्ह-ाण जिल्हाध्यक्ष संघर्ष असंघटीत बांधकाम कामगार संघटना महाराष्ट्र राज्य , यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## संक्षिप्त

### महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम अंमलबजावणीसाठी मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (नियमाधीन करणे श्रेणीवाद व नियंत्रण) अधिनियम, २०२१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ३१ डिसेंबर २०२० पुर्वीचे अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास मान्यता दिलेली आहे. जालना जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना जालना यांच्याकडील नोंदणीकृत परवानाधारक आर्किटेक्ट इंजिनियर यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करण्यास दि. ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी दिनांक ३० जुन, २०२६ पुर्वी विहीत कागदपत्रासह प्रस्ताव गुंठेवारी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करावे. तसेच उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्रस्ताव दाखल केले नसल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनाधिकृत भुखंडाची खरेदी- विक्री किंवा सदर झालेले बांधकाम हे अतिक्रमण समजण्यास येऊन उक्त अधिनियमातील कलम -७ (१) मधील तरतूदी अन्वये अशी अनधिकृत विनापरवाना बांधकामे पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

### बच्चू कडू यांच्या आंदोलनाला मराठा क्रांती मोर्चाचा पाठिंबा
### मागण्या मान्य न झाल्यास जालना जिल्हाभर तीव्र आंदोलनाचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/शेतकरी कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव आणि दिव्यांगांच्या विविध प्रश्नांबाबत अभिनव महाराष्ट्र पक्षाचे आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे मंगळवार, दि. २८ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू झाले आहे. मात्र या आंदोलनाकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त करत मराठा क्रांती मोर्चाने या आंदोलनाला अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. सरकारने मागण्या तात्काळ मान्य केल्या नाहीत, तर जालना जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने देण्यात आला आहे.


जालना येथे बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी मराठा क्रांती मोर्चाची जिल्हास्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीस राज्य समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील, तसेच संतोष गाजरे, अरविंद देशमुख, अशोक पडूळ, संदीप ताडगे, पंकज जऱ्हाड, शरद देशमुख, राजेंद्र गोरे, ज्योतीराम माने, मच्छिंद्र घोगरे, बबनराव गवारे, सुभाष चव्हाण, ड. शैलेश देशमुख आणि ड. लक्ष्मण उढाण यांसारखे जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत बच्चू कडू यांच्या आंदोलनातील प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व सदस्यांनी एकमुखाने निर्णय घेतला की, सरकारने शेतकरी आणि दिव्यांगांसाठी तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर मराठा क्रांती मोर्चा जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन करून शासनाला जाग आणेल.

बैठकीत नेत्यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार, अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, अजूनही अनेक शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित आहेत. सरकारने दिलेली कर्जमाफी पूर्णत्वाला गेलेली नाही, आणि रब्बी हंगाम दारात उभा आहे. शेतकरी संकटात असताना शासन मात्र मौन बाळगून आहे, अशी टीका करण्यात आली. मराठा क्रांती मोर्चाने यावेळी दिव्यांग बांधवांच्या प्रलंबित मागण्यांनाही पाठिंबा दिला आहे. दिव्यांगांच्या सन्मानासाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना, शासकीय नोकऱ्यांमधील राखीव जागांची भरती आणि पेन्शनवाढ याबाबत राज्य सरकारकडून ठोस निर्णय व्हावा, अशी मागणी मोर्चाने केली. बैठकीनंतर बोलताना राज्य समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील म्हणाले, बच्चू कडू यांनी घेतलेला लढा हा सामान्य जनतेचा आवाज आहे. शेतकरी, कामगार, दिव्यांग, युवक - या सर्वांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केले तर आम्ही जालना जिल्हाभर शांततामय पण तीव्र आंदोलन उभारू. मोर्चाने पुढील काही दिवसांत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं आणि तहसील पातळीवर जनआंदोलन उभारण्याची तयारी सुरू केल्याचे संकेतही दिले आहेत. मराठा क्रांती मोर्चाने स्पष्ट इशारा दिला आहे की, बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनातील मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर शासनाला खऱ्या अर्थाने जनआक्रोशाचा सामना करावा लागेल. त्यामुळे आता सरकारकडून या आंदोलनाकडे कोणती भूमिका घेतली जाते, याकडे राज्याचे आणि विशेषतः जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# स्थानिक स्वराज्य निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कायदा व सुव्यवस्था बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ आगामी कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक प्रक्रीया पार पडणार असुन, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली त्यावेळी श्रीमती मित्तल या बोलत होत्या. यावेळी बैठकीस पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, प्रभारी अपर उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, येणाऱ्या कालावधीत स्वराजय संस्थेच्या निवडणूक होणार आहे. याकरीता जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात शांततेसाठी आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न् उद्भवणार नाही यासाठी पूर्व नियोजन करावे. तसेच सदर कालावधीत जिल्ह्यात व्यवस्थित बंदोबस्त ठेवण्यात यावा. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन व संभाव्य कायदा सुव्यवस्था प्रश्नांवर उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यात कुठेही कोणताही अनुचित प्रकार किंवा गुन्हेगारी घटना घडू नये यासाठी दक्षता घ्यावी. गुन्हेगाराविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५, ५६ व ५७ अन्वये तातडीने कारवाई होण्याचे अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी समन्ववय साधुन प्रकरण दाखल झालेपासुन एक महिन्यात निकाली काढावेत. तसेच तात्काळ प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. हद्दपार इसम आदेशाचे पालन करत असल्याचे पोलीस विभागाने वेळोवेळी तपासणी करावी. प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रकरणे चालविण्याकरीता दिवस व वेळ निश्चित करुन प्रकरणे निकाली काढावीत. जेणेकरुन तातडीने प्रकरणे निकाली निघतील. गुन्हेगाराविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाईचे अनुषंगाने तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याकरीता पोलीस विभागाने आवश्यक तपासणी करुन चझऊ- कायद्यांतर्गत स्थानबध्द्तेकरीता प्रस्ताव सादर करावेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२६, १२७, १२८, १२९ अन्वये पोलीस विभागाकडून करण्यात प्रतिबंधात्मक कारवाई मध्ये प्रकरणपरत्वे, अंतिम बंधपत्र घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी असुन, अंतीम बंधपत्र घेणे. तसेच बंधपत्राचे पालन होत असल्याची बाब पोलीस विभागाने तपासणी करावी. यासाठी संबंधित पोलीस निरीक्षक व कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी वेळोवेळी एकत्रित बैठक आयोजीत करुन बैठकीत आढावा घ्यावा. तसेच अवैध मद्य विक्री होणार नाही याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाने पथक स्थापन करुन सदर पथकामार्फत रात्रवेळी गस्त तसेच तपासणी करुन अवैध मद्य विक्री विरोधात कारवाई करावी. शहरातील तसेच पुर्ण जिल्ह्यातील गुन्हेगारी वाढणार नाही, याकरीता सर्व यंत्रणामध्ये समन्वय ठेवून वेळोवेळी कारवाई करावी. सोशल मिडिया व इतर माध्यमांतून अफवा फैलवणाऱ्यांवर कडक कारवाई करावी.

कायदा व सुव्येवस्थोचे अनुषंगाने गुन्हे गाराविरुध्दि प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई होणेकरीता महसूल विभाग व पोलीस विभागात समन्वायासाठी पोलीस स्टेवशन निहाय कर्मचारी यांची नियुक्ती् करणे व त्यां चे मार्फत पाठपुरावा करुन प्रचलित कायद्यान्वीये प्रतिबंधात्मनक कारवाई पुर्ण करावी. पोलीस पाटील पदाकरीता निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून, निवड झालेल्या उमेदावारांचे पोलीस विभागाने चारित्र्य पडताळणी तात्काळ उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन सदरील पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करता येईल. तसेच नागरिकांनी देखील सहकार्य करून शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

यावेळी पोलीस अधिक्षक बंसल म्हणाले की, आगामी काळात पार पडणाऱ्या निवडणूक वेळी जिल्ह्यात शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याच्या अनुषंगाने पोलिस विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच भरारी पथके, चेकपोस्ट आणि तक्रार निवारण केंद्र ठिकाणी ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार होणार नाही, तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागामार्फत योग्य नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार यांची उपस्थिती होती.

## वाळुची अवैध वाहतुक करणाऱ्या तस्करांना तडीपार करावे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ महसूल व पोलिस प्रशासनाने अवैध वाळु चोरी विरोधात संयुक्त कारवाई करावी. प्रत्येक तालुक्यातील अवैध वाळु वाहतुक असलेली ठिकाणे तहसीलदार व पोलिस विभागाने निश्चित करावे. अशा ठिकाणी सीसीटिव्ही लावण्याची कारवाई करण्यात यावी. तरी जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतुक करणाऱ्या तस्करांना तडीपार करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अवैध वाळु उपसा रोखण्यासाठी विशेष बैठक पार पडली, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, प्र.अपर जिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्र.निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा खनिकर्म अधिकारी तुषार निकम यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार आदि प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतूक रोखण्यासाठी ड्रोनचा वापर करावा तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने जिल्ह्यात रस्त्यावर धावणाऱ्या विना क्रमांकाच्या ट्रॅक्टर, टिप्पर, ट्रक आणि हायवा यासह इतर वाहनावर तात्काळ कारवाई करावी. तसेच तहसील कार्यालय व पोलिस ठाणे येथे दंडात्मक कार्यवाहीतील वसुली प्रलंबित असलेल्या वाहनांचा त्वरीत लिलाव करण्यात यावा. एमपीडीएम कायद्याचा वापर कमी होत असल्याने अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानबध्दता होण्यासाठी



कारवाई करावी. वाळुची चोरी रोखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचा स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक लवकरच उपलब्ध करुन दिला जाणार असून त्यावर अचुक माहिती देवून अवैध वाळुची वाहतुक करणारे वाहन पकडले गेल्यास त्या व्यक्तीला ५ हजार रुपयांचे बक्षिसही दिले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## हिंदु खाटीक समाजातील अर्जदारांनी अर्ज सादर करावेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या अनुदान, बीज भांडवल व थेट कर्ज योजना तसेच एनएसएफडीसी योजनेतंर्गत सन २०२५-२६ वर्षाकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. तरी हिंदु खाटीक समाजातील इच्छुक अर्जदारांनी लाभासाठी जिल्हा कार्यालय जालना येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्या. ( महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. यांची उपकंपनी) जिल्हा कार्यालय जालना येथे वष २०२५-२६ या आाथक वर्षासाठी अनुदान योजना-५, बीज भांडवल योजना-५, थेट कर्ज योजना-२ आणि एनएसएफडीसी योजना -६ याप्रमाणे उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. तरी हिंदु खाटीक समाजातील इच्छुक अर्जदारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा कार्यालय जालना येथे संपर्क साधावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका, आधार कार्ड, पॅन कार्ड, कोटेशन, प्रकल्प अहवाल, व्यवसाय जागेचा पुरावा, पासपोर्ट फोटो आणि व्यवसाय लायसन्स आदि कागदपत्राच्या छायांकित प्रतिसह सादर करावा. असेही कळविले आहे.

# विप्र समाजाने रोटी-बेटी व्यवहार सुरु करावेत- रामनिवास गौड

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ विप्र समाजाने पुन्हा रोटी-बेटी व्यवहार सुरू करून सामाजिक संबंध दृढ करावेत. त्याचबरोबर समाजातील शिक्षण, उद्योग आणि संस्कृती यासाठी एकत्र काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन विप्र फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रामनिवास गौड यांनी येथे बोलताना व्यक्त करून समाजातील ऐक्याचे आणि आत्मीयतेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. विप्र फाउंडेशन शाखा, जालनाच्यावतीने रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी गायत्री मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या दीपावली स्नेह मिलन व अन्नकुट उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून रामनिवास गौड बोलत होते.

यावेळी आशीर्वचन देण्यासाठी उपस्थित असलेले भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी यांनी आपल्या भाषणातून विप्र फाउंडेशनच्या कार्याची प्रशंसा केली.

विप्र फाउंडेशन समाजातील तरुणांना योग्य दिशा देत अडून, त्यांच्या उपक्रमांमुळे समाजात नवचैतन्य निर्माण होत आहे. हे कार्य प्रेरणादायी असून सर्वांनी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. विप्र फाऊंडेशनचे अध्यक्ष जयप्रकाश श्रीमाली यांनी प्रत्येक सदस्याने समाजाच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. एकत्र येणे, चर्चा करणे आणि समाजहितासाठी कार्य करणे हेच आपल्या प्रगतीचे गमक असल्याचे सांगून या वर्षीच्या अन्नकुट महोत्सवाचे यजमानपद स्वीकारणाऱ्या खंडेलवाल समाजाचे त्यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी यांनी केले तर उपस्थितांचे आभार विप्रो फाउंडेशनचे सचिव पं. विजयकुमार व्यास यांनी मानले.

कार्यक्रमाला कैलास खंडेलवाल, किशोर मिश्रा, उमेश पंचारिया, बंकटलाल खंडेलवाल, डुंगरसिंह राजपुरोहित, युवा अध्यक्ष परीक्षित शर्मा, युवा सचिव संतोष खंडेलवाल, गौरीशंकर खंडेलवाल, दिलीप गौड, लक्ष्मीनारायण खंडेलवाल, महेश खंडेलवाल, उमेश खंडेलवाल, दिलीप व्यास, चंद्रप्रकाश श्रीमाळी, दीपेश व्यास,



संजय सारस्वत, प्रवीण शर्मा, सतिष शर्मा, राजेश गौड, दुर्गेश दायमा,ओमप्रकाश दायमा, अशोक शर्मा, अशोक मिश्रा, गजानन सारस्वत, हितेश जोशी, शैलेश व्यास, मनोज दायमा, नारायण दायमा, सुरेश शर्मा, किशोर शर्मा, वरुण शर्मा, नंदकिशोर गौड, महिला अध्यक्ष सौ. जया शर्मा, सचिव सौ. मंजू श्रीमाळी, कोषाध्यक्ष सौ. अरुणा पारिक, सौ. कल्पना गौड, सौ. ममता शर्मा यांच्यासह जालना शहर व परिसरातील विप्र बांधव, भगिनी आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संजय आबा जाधव यांचे लोककल्याणासाठी 'अहोरात्र' काम: विकासकामांचा डोंगर उभा

## * पारनेर (प) सर्कलसाठी संजय जाधव यांचे विकासाचे मॉडेल; *जनसेवेच्या कार्यामुळे परिसरात 'रोखठोक नेता' म्हणून ओळख!



**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड प्रतिनिधी** / अंबड: जनसेवा हेच व्रत मानून, आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे आणि 'रोखठोक नेता' म्हणून ओळखले जाणारे संजय आबा जाधव यांनी केवळ त्यांच्या मूळ गावी धनगर पिंपरी येथेच नव्हे, तर संपूर्ण सर्कलमध्ये विकासकामांचा अक्षरशः डोंगर उभा केला आहे. तंटामुक्ती अध्यक्ष, माजी उपसरपंच (१० वर्षे ग्रामपंचायत सदस्य) आणि भाजपचे उपतालुका अध्यक्ष या विविध पदांवर काम करताना त्यांनी गोरगरीब आणि वंचितांसाठी केलेले निस्वार्थ कार्य आज परिसरासाठी एक आदर्श ठरले आहे.

### जलक्रांती आणि आरोग्य

संजय जाधव यांनी वॉटर संस्थेच्या माध्यमातून केलेल्या कामाची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी गरजू कुटुंबांसाठी ७० हजार रुपये किमतीची ८५ शौचालये मोफत उपलब्ध करून दिली.

याशिवाय, धनगर पिंपरी, पारनेर, शेवगाव आणि लालवाडी या चार ठिकाणी प्रत्येकी पाच अशा एकूण २० ठिकाणी हातपंप बसवून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. वॉटर संस्थेच्या माध्यमातून त्यांनी वैयक्तिक स्प्रिंकलर योजना गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली, ज्यामुळे अनेक गरिबांना शेतीसाठी पाण्याचा फायदा झाला.

### वंचितांना आधार आणि रुग्णसेवा

केवळ पाणी आणि आरोग्यावरच नव्हे, तर निराधारांना आधार देण्यासाठीही त्यांचे कार्य मोलाचे आहे. त्यांनी 'संजय निराधार' योजनेतून सुमारे ३०० निराधारांना नियमित वेतन/मदत मिळवून दिली. तसेच, अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना आणि पंतप्रधान आवास योजनेतून (झच्) सतत पाठपुरावा करून अनेक गरीब कुटुंबांना हक्काचे घर मिळवून दिले. विशेष म्हणजे, ते कोणत्याही रुग्णकाच्या सेवेसाठी तात्काळ हजर असतात आणि रुग्णकांना त्यांच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असणारे सर्कल मधील एकमेव व्यक्ती म्हणून ओळखले जातात.

### गावाचा विकास आणि युवा प्रेरणा

धनगर पिंपरी येथील स्मशानभूमी शेडचे बांधकाम असो, किंवा कर्जत रस्ता धनगर पिंपरी ते नागझरी पानंद रस्ता मार्गी लावणे असो, गावाच्या मूलभूत सुविधांसाठी ते नेहमीच तत्पर राहिले आहेत. त्यांनी कोणत्याही पदावर असोत किंवा नसोत, अहोरात्र जनसेवेचे व्रत पाळले आहे. तसेच, तंटामुक्ती अध्यक्ष असताना त्यांनी गावाला २ लाख रुपयांचे युवक बक्षीस मिळवून दिले, जे परिसरातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरले.

### संघर्ष आणि समर्पण

संजय जाधव यांच्या कार्याची सर्वात मोठी ओळख म्हणजे, ते केवळ गावापुरते मर्यादित राहिले नाहीत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणासाठी किंवा सामाजिक न्यायासाठी लढ्यात ते नेहमी हजर असणारे एकमेव आणि रोखठोक नेते म्हणून सर्कलमध्ये ओळखले जातात. कोणत्याही योजनांचा फायदा देताना त्यांनी कधीही स्वार्थ पाहिला नाही, म्हणूनच त्यांची प्रतिमा एक निस्वार्थ लोकसेवक अशी तयार झाली आहे.

### * निष्कर्ष

जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी हजर असणारे, गोरगरिबांना न्याय मिळवून देणारे आणि विकासकामांमध्ये सातत्य ठेवणारे संजय आबा जाधव यांचे हे कार्य इतरांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या धडाकेबाज नेतृत्वामुळे आणि लोककल्याणाच्या कार्यामुळे परिसरातील नागरिक त्यांच्यावर भरभरून कौतुक करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813